ePaper

## मी जरी डॉक्टर नसलो तरी मोठं मोठी ऑपरेशन केली आहेत : एकनाथ शिंदे



| वर्ष - 8 | अंक - 253 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

### आतील पानांत

- जोस बटलरचा तडाखा
- मोहम्मद सिराजची भावुक घरवापसी!
- भारताला मुस्लिम राष्ट्र बनवायचे आहे का?
- ९०० हून अधिक औषधे महागली

www.mahaenews.com | गुरुवार, दि. 3 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये घमासान

# ‘वक्फ’ चा खेळ खल्लास!

## 288 विरुद्ध 232 मतांनी विधेयक मंजूर



**विधेयकाच्या बाजूने बहुमत : नितीशकुमार आणि चंद्रबाबू यांचे पक्ष विधेयकाच्या बाजूने**

**| नवी दिल्ली | प्रतिनिधी | महाईन्यूज**

‘वक्फ बोर्ड’ सुधारणा विधेयकावर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये अक्षरशः रणकंदन झाले. शेवटी रात्री उशिरा झालेल्या मतदानाच्या वेळी विधेयकाच्या बाजूने २८८ तर विरोधात २३२ मते पडली आणि विधेयक मंजूर झाले.संसदीय कार्यमंत्री किरण रिजीजू यांनी चर्चेसाठी हे विधेयक मांडले आणि दोन्ही बाजूंच्या सदस्यांमध्ये घमासान झाले. लष्कर आणि रेल्वेनंतर देशातील सर्वात जास्त जमिनीचा ताबा वक्फ बोर्डाकडे असल्याचे सर्वांनीच आवर्जून सांगितले. एवढी प्रचंड जमीन ताब्यात असताना मुस्लिम समाज गरीब कसा ? हा प्रश्नही या निमित्ताने पुढे आला. रात्री उशिरापर्यंत या विधेयकावर चर्चा सुरू होती. शेवटी विधेयक मंजूर झाले आणि वक्फ बोर्ड कायदा अस्तित्वात आला. प्रचंड गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज मात्र आजसाठी स्थगित करण्यात आले. वक्फ बोर्डाचा एकूणच ‘खेळ खल्लास’ होणार हे आता सिद्ध झाले आहे.

### 1.2 लाख कोटींची वक्फ कडे जमीन

२००९ नंतर वक्फ बोर्डाच्या संपत्तीमध्ये दुपटीने वाढ झाली असून त्यांची संपत्ती १.२ लाख कोटीच्या वर गेली आहे. अल्पसंख्यांक कल्याण मंत्रालयाने डिसेंबर २०२२ मध्ये लोकसभेत दिलेल्या माहितीनुसार या बोर्डाकडे आठ लाख ६५ हजार ६४४ स्थावर मालमत्ता आहेत आणि एकूण ९.४ लाख एकर जमीन आहे ज्याची किंमत १.२ लाख कोटी आहे.

### मुस्लिम देशांची अवस्था काय?

तुर्कस्तान, लीबिया, इराण, इराक सुदान, सीरिया, लेबनॉन, जॉर्डन तसेच ट्युनिशिया या प्रमुख मुस्लिम राष्ट्रांमध्ये वक्फ बोर्ड अस्तित्वात नाही, हा खुलासा अनेक खासदारांनी केला. मग, भारतामध्ये त्याचे अस्तित्व कशासाठी? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला.

### सर्वात जास्त जमीन उत्तर प्रदेशात

वक्फ ने ताबा मिळवलेली सर्वात जास्त जमीन आणि संपत्ती उत्तर प्रदेशात आहे. त्या खालोखाल तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल यांचा क्रमांक लागतो. एकट्या हैदराबाद मध्ये वक्फ जवळ ७७ हजार प्रॉपर्टीज आहेत. देशामध्ये तेलंगणातील वक्फ बोर्ड सर्वात श्रीमंत मानले जाते.

### पं. नेहरू यांच्यामुळे..

पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू सरकारने १९५४ मध्ये वक्फ कायदा बनवला. त्यांच्याकडे आलेल्या जमिनीची देखभाल करण्यासाठी मग वक्फ बोर्डची स्थापना झाली. फाळणीनंतर जे मुस्लिम पाकिस्तानात गेले, त्यांच्या येथील जमिनींचा ताबा या कायद्यामुळे वक्फ बोर्डाकडे गेला.

### देशात 32 वक्फ बोर्ड ; शिया- सुन्नींचे वेगळेच..

देशात सध्या वेगवेगळ्या भागात ३२ वक्फ बोर्ड सक्रिय आहेत. शिया आणि सुन्नीसाठी असलेले बोर्ड अजून वेगळेच आहेत.

### मुस्लिम समाज शिक्षण, उद्योगात मागेच

संपूर्ण देशात वक्फ बोर्डाकडे एवढी संपत्ती असून देखील त्याचा गैरवापर होत असल्यामुळे आणि श्रीमंत अधिक श्रीमंत, तसेच गरीब अधिकच गरीब होत असल्यामुळे मुस्लिम समाज मागासवर्गीय राहिला आहे. शिक्षण क्षेत्रात आणि उद्योग धंद्यात समाजाला पुढे न येऊ देण्यात वक्फ बोर्डाचा मोठा वाटा आहे, असे मतही मांडण्यात आले.

### कोणते पक्ष विधेयकाच्या बाजूने कोण विरोधी..?

सभागृहातील चर्चेचा नूर बघितला, तर विधेयकाच्या बाजूने २९४ मते मिळतील आणि विरोधात २४७ मते जाऊ शकतात. विधेयकाच्या बाजूने मतदान करणाऱ्यांमध्ये भाजपा, चंद्राबाबूंचा तेलुगु देशम, नितीश कुमार यांचा जेडीयू, एकनाथ शिंदे शिवसेना, चिराग पासवान यांचा एलजेपी, आरएलडी आणि इतर छोटे पक्ष आहेत. तर विरोधी मतदान करणाऱ्यांमध्ये काँग्रेस, समाजवादी पक्ष, तृणमूल काँग्रेस, लालूप्रसाद, नवीन पटनाईक यांचे पक्ष, शरद पवार गट, उबाठा गट तसेच अनेक छोटे छोटे पक्ष आहेत.

### फडणवीस यांची भूमिका..

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वक्फ बोर्ड संशोधन विधेयकाबाबत भूमिका मांडताना स्पष्ट केले, की ज्यांनी या विधेयकाला विरोध सुरू केला आहे, त्यांचे लक्ष फक्त वोट बँक आणि मुस्लिमांचे तुष्टिकरण करण्याकडे आहे. मुस्लिमांचे चांगले व्हावे आणि त्यांना एक दर्जेदार जीवन जगता यावे, यासाठी हे विधेयक मंजूर होणे आवश्यक आहे, आणि ते होणारच आहे. सुधारित विधेयकामुळे या बोर्डामध्ये महिलांना प्रतिनिधित्व मिळणार आहे, हे अतिशय पुरोगामी पद्धतीचे पाऊल म्हणावे लागेल. हे विधेयक कोणत्याही समाजाच्या धार्मिक श्रद्धांच्या विरोधात नाही. ज्यांची सदसदविवेकबुद्धी जागृत आहे, ते सर्वजण या विधेयकाचे समर्थन करतील, असेही ते म्हणाले.

### काँग्रेसप्रणित ‘इंडी’ आघाडीची भूमिका

काँग्रेसप्रणित ‘इंडी’ आघाडीने या विधेयकाला जोरदार विरोध केला आहे. हे विधेयक मुस्लिमांना एकाकी पाडण्यासाठी आहे. आज मुस्लिम झाले, उद्या पारशी, ख्रिश्चन, जैन, नवबुद्ध हे अल्पसंख्यांक समाज भाजपाच्या ‘टार्गेट’ वर येतील, असे त्यांनी सूचित केले आहे. हे वक्फ बोर्डाचे सशक्तिकरण आहे, की त्याच्यावर ताबा मिळवण्याचा डाव आहे, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला आहे

### महाराष्ट्रातील दोन जमिनींचा संदर्भ


हे विधेयक सर्वांना स्वीकारायलाच हवे, असे सांगून गृहमंत्री अमित शहा यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्रातील वक्फ बोर्डाने दावा केलेल्या दोन जमिनींचा उल्लेख केला. कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे या गावातील एका मंदिराच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा केला आहे आणि बीड जिल्ह्यातील कन्कलेश्वर मंदिराच्या जमिनीवर दावा केला आहे, असे ते म्हणाले.

# स्वयंमूल्यांकनात शिक्षकांची दमछाक!

## स्वयंमूल्यांकनासाठी आता 10 एप्रिलची मुदत देण्यात आली

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) शाळा गुणवत्ता मूल्यांकन आणि आश्वासन आराखड्याअंतर्गत (स्क्वॉफ) स्वयंमूल्यांकनाची माहिती भरण्यासाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ दिली आहे. मात्र, या स्वयंमूल्यांकनातील १२८ मानकांची माहिती भरणे आणि छायाचित्रे, चित्रफिती जोडण्याच्या कामात शिक्षकांची दमछाक होत असल्याचे चित्र आहे.**



एससीईआरटीने स्थापन केलेल्या राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षातर्फे राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात शाळांनी स्वयंमूल्यांकन करणे अपेक्षित आहे. त्यानुसार या प्रक्रियेसाठीचा ऑनलाइन दुवा उपलब्ध करून देत शाळांना स्वयंमूल्यांकनासाठीची माहिती भरणे, छायाचित्रे, चित्रफिती जोडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांच्या परिपत्रकानुसार आतापर्यंत राज्यातील सर्व शाळांची ही प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. त्यामुळे या प्रक्रियेसाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली असून, स्वयंमूल्यांकनासाठी आता १० एप्रिलची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे स्वयंमूल्यांकन नोंदणी आणि पूर्तता पूर्ण करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे. या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे कार्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले, स्वयंमूल्यांकनामध्ये १२८ मानके निश्चित करण्यात आली आहेत. प्रत्येक मानकाची माहिती भरणे, त्यासाठी आवश्यक छायाचित्रे, चित्रफिती जोडणे बंधनकारक आहे. त्यासाठी आता तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. इतके करून काय साध्य होणार हा प्रश्न आहे. कारण, या पूर्वीच अशा प्रकारचा शाळा सिद्धी हा उपक्रम राबवण्यात आला होता. त्याचे पुढे काही झाले नाही. मुख्यमंत्री माझी शाळा अभियानातही माहिती मागवली जाते. मात्र चांगली कामगिरी करणाऱ्या शाळांना किमान पारितोषिके तरी मिळतात. शाळा स्तरावर पुरेसे मनुष्यबळ नाही,

### शाळा स्तरावर पुरेसे मनुष्यबळ नाही

त्यामुळे या प्रक्रियेसाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली असून, स्वयंमूल्यांकनासाठी आता १० एप्रिलची मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत सर्व माध्यमाच्या, सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे स्वयंमूल्यांकन नोंदणी आणि पूर्तता पूर्ण करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे कार्याध्यक्ष विजय कोंबे म्हणाले.

सुविधा नाहीत. छायाचित्रे किती काळ जपून ठेवायची? केवळ या मूल्यांकनासाठी जुनी छायाचित्रे शोधून माहिती भरावी लागत आहे. राज्यात शिकणे, शिकवणे सोडून बाकी सारे काही होत आहे, असे मतही त्यांनी मांडले. स्वयंमूल्यांकनातील माहिती या पूर्वी दिलेली आहे. मात्र आता ती पुन्हा द्यावी लागणार आहे. हे काम ऑनलाइन असल्याने त्यासाठी सर्वच शिक्षक प्रशिक्षित नाहीत. त्याशिवाय परीक्षांचे दिवस असताना त्यात हेही काम करावे लागत असल्याचे दमछाक होत असल्याचे कृतिशील शिक्षक महाराष्ट्र या शिक्षक गटाचे संयोजक विक्रम अडसूळ यांनी सांगितले.एससीईआरटीने स्थापन केलेल्या राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षातर्फे राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात शाळांनी स्वयंमूल्यांकन करणे अपेक्षित आहे. त्यानुसार या प्रक्रियेसाठीचा ऑनलाइन दुवा उपलब्ध करून देत शाळांना स्वयंमूल्यांकनासाठीची माहिती भरणे, छायाचित्रे, चित्रफिती जोडण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. एससीईआरटीचे संचालक राहुल रेखावार यांच्या परिपत्रकानुसार आतापर्यंत राज्यातील सर्व शाळांची ही प्रक्रिया पूर्ण झालेली नाही.

---

# 'बोलने वाले बोलते रहे, वो काम ही करता जाए'

## स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा विरोधात पुण्यात फ्लेक्सबाजी

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**काही दिवसापूर्वी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बदनामीकारक गाणं सादर केल होत. यावरून मोठ्या प्रमाणावर वाद पाहण्यास मिळाला होता.त्याच दरम्यान पुण्यातील सामाजिक कार्यकर्ते वैभव वाघ यांनी टिळक रोडवर रिक्षा चालवताना एकनाथ शिंदे आणि मागे बसलेला 'कॉमन मॅन' आणि 'बोलनेवाले बोलते रहें, वो काम ही करता जाए !' या आशयाचे मजकूर असलेला फ्लेक्स लावण्यात आला आहे.**




ठाणे की रिक्षा, चेहरे पे दाढी' गाण्यांच्या ओळी लिहीत 'शेर नजर वो आए' असा उल्लेख एकनाथ शिंदे यांचा करण्यात आला.तर हिंदुत्वाचा कैवारी, चिपळूणचा महापूर, इर्शाळवाडीची दुर्घटना यामध्ये शिंदे यांनी तत्परता दाखवत थेट घटनास्थळी जाऊन केलेले कार्य, आरोग्य कक्षाच्या माध्यमातून केलेले कार्य यासह लाडकी बहीण योजना या काव्यातून मांडली आहे.काश्मीरच्या लाल चौकातील गणेशोत्सवात त्यांनी घेतलेला सक्रिय सहभाग यातून त्यांची कीर्ती ठाणेच नव्हे, तर पूर्ण देशभर असल्याचे दिसून येते,असे ही यातून सांगण्याचा

### ठाण्याची रिक्षा सुसाट

कलेच्या नावाखाली अशी विकृती आपण सहन करता कामा नये.सामान्य माणसासाठी अहोरात्र झटणाऱ्या एकनाथ शिंदे यांचा गौरव आणि सन्मान करणे आपले कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले. काही दिवसापूर्वी स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर बदनामीकारक गाणं सादर केल होत. यावरून मोठ्या प्रमाणावर वाद पाहण्यास मिळाला होता.

प्रयत्न करण्यात आला आहे. या फ्लेक्सबाजी बाबत वैभव वाघ म्हणाले,एकनाथ शिंदे यांनी अवघ्या अडीच वर्षात मुख्यमंत्री केलेले लोकोपयोगी कार्य प्रेरणादायी आहे. सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून अधिकाधीक चांगल्या सोयीसुविधा, योजना देण्याचे काम त्यांनी केले.लाडकी बहीण योजना आणली, मुख्यमंत्री आरोग्य सहायता कक्षातून लाखो गोरगरिबांना सेवा दिली. उपलब्ध असणाऱ्या उपमुख्यमंत्र्यांबाबत कुणाल कामराने बदनामीकारक वक्तव्य संतापजनक आहे.कोणतेही कार्य न करणाऱ्या माणसाने शिंदे यांच्यासारख्या सर्वसामान्यांचा कैवारी असलेल्या व्यक्तीवर अवमानजनक काव्य रचणे ही विकृती आहे.

## जागरुक करदात्यांनी भरला


# तब्बल 966 कोटींचा मालमत्ताकर!

### ऑनलाइन स्वरुपामध्ये कर भरण्यास करदात्यांची पसंती; पालिकेकडून करदात्यांचे आभार...

| पिंपरी-चिंचवड |
महाईन्यूज | प्रतिनिधी|

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने २०२४-२५ या आर्थिक वर्षात तब्बल ९६६ कोटी रुपयांचा कर वसूल केला आहे. तब्बल ६ लाख ३० हजार २९४ मालमत्ताधारकांपैकी ५ लाख ०२ हजार ०२८ व ९२ हजार ४६५ नव्या आकारणी झालेल्या मालमत्तांधारकांमधून ६० हजार ७२ मालमत्तांनी ९८ कोटींचा कराचा जागरुकपणे भरणा केला असून त्यांचे महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी मन:पूर्वक आभार मानले आहेत.**






सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मालमत्ताधारकांना कर भरण्यासाठी प्रवृत्त करण्यासाठी करसंकलन विभागाने विविध कार्यपध्दती अंवलबविली असून यामध्ये सर्वप्रथम बिगरनिवासी, औद्योगिक व मिश्र मालमत्तांना जप्तीची पूर्वसुचना देऊन ज्या थकबाकीदारांनी कराचा भरणा करण्यास टाळाटाळ केला अशा मालमत्ता सर्वप्रथम सील करण्यात येऊन त्यांची लिलाव प्रक्रियेची नोटीस सर्व वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली. त्यामधील जवळपास ४३४ मालमत्ता अंतिम लिलावाच्या उंबरठ्यावर असून त्यांचा निश्चितपणे माहे एप्रिल व माहे मे २०२५ मध्ये लिलाव करण्यात येणार आहे. त्यासोबतच शहरातील थकबाकी असणाऱ्या रहिवाशी मालमत्तांचे नळ जोडणी खंडीत करुन त्यांच्या सातबाऱ्यावर बोजा चढविण्याची कारवाई व सदनिकाधारकांच्या शेअरसर्टिफिकेटवर थकीत रकमेचा बोजा चढविण्याची कारवाई करण्याच्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात आला. सोबतच, थकीत बिगरनिवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मिश्र मालमत्तांच्या एकूण १०७२ मालमत्तांवर जप्तीची धडक कारवाई करण्यात आली. याबरोबरच रील्स स्पर्धा, टेलिकॉलिंग, एसएमएस यासारख्या माध्यमातून आवाहन करण्यात आले. त्यासोबतच शहरामध्ये होर्डिंग, रिक्षाद्वारे, सार्वजनिक ठिकाणी अनांऊसमेंट, पाम्प्लेट व समाजमाध्यमांद्वारे जनजागृतीच्या माध्यमातून करसंकलन विभाग करदात्यांपर्यंत पोहोचल्याने चालूवर्षी ९६६ कोटींचा कर वसूल करण्यात यश आले आहे. करसंकलन विभागाने घेतलेल्या सर्व पुढाकारांमुळे मोठ्याप्रमाणात करवसूली करण्यास कर आकारणी व कर संकलन विभागाला सातत्य राखता आले आहे. असे कर आकारणी व कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी स्पष्ट केले.

#### करसंकलनाच्या ठळक बाबी

- ४० टक्क्यांची थकबाकी वसुली
- चालू करामध्ये ८६ टक्क्यांची वसुली
- तब्बल १०७२ इतक्या मालमत्तांवर जप्तीची कारवाई
- जवळपास ३ लाखाहून अधिक मालमत्ताधारक मालमत्ताकर भरण्यामध्ये झाले नियमित
- पहिल्यांदाच मालमत्ताधारकांच्या सातबारा व सदनिकाधारकांच्या शेअर सर्टिफिकेटवर थकीत कराचा बोजा
- थकीत रहिवाशी मालमत्ताधारकाची यादी प्रत्येक सोसायटीचे अध्यक्ष/सचिवाला दिली.

#### मालमत्ताकर भरणाऱ्या मालमत्तांची मालमत्ताप्रकारानुसार आकडेवारी..!

**(मालमत्ता संख्या रक्कम कोटींमध्ये)**

| | |
|---|---|
| निवासी | – 579 |
| बिगरनिवासी | –227.39 |
| औद्योगिक | – 54 |
| मिश्र | – 71.79 |
| मोकळ्या जमीन | – 33.41 |
| इतर | – 0.11 |
| एकूण | – 965.7 |

#### नागरिकांची 'ऑनलाइन' स्वरुपात कर भरण्यास पसंती !

| भरणा प्रकार | – रक्कम कोटींमध्ये |
|---|---|
| ऑनलाईन | – 577.70 |
| धनादेशाद्वारे | – 142.84 |
| रोख | – 108.98 |
| अवैध शास्ती समायोजन | – 35.95 |
| आरटीजीएस | – 44.92 |
| बीबीपीएस | – 22.47 |
| एनईएफटी | – 19.58 |
| डीडी | – 6.69 |
| इडीसी | – 3.35 |
| समायोजन | – 2.56 |
| IMPS | – 0.66 |
| एकूण | –965.70 |

#### विविध मोहिमांद्वारे मालमत्ताकर भरण्यास करदात्यांना आवाहन...

महानगरपालिकेच्या करसंकलन विभागाने नेहमीप्रमाणे मालमत्ताकर वसूलीसाठी विविध सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून मालमत्ताकर भऱण्यासाठी आवाहन करण्यासाठी पुढाकार घेतला. यामध्ये करसंकलन विभागाने 'मी जागरुक करदाता' रील-गाणे-रॅप बनवा या स्पर्धेतून नागरिकांनी कर भऱण्याचे सर्जनशील स्वरुपात आवाहन केले. चालू ट्रेंड व समाजमाध्यमांचा योग्य वापर केल्याने करसंकलन विभागाने समाजमाध्यमाचाही प्रभावीपणे वापर केला आहे. यामध्ये रीलस्पर्धेमधील व्हिडिओ तब्बल पाच लाखाहून अधिक नागरिकांपर्यंत पोहोचले आहेत. समाजमाध्यमासोबतच करसंकलन विभागाने नागरिकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला. यामध्ये शहरामध्ये ज्या भागामध्ये थकबाकीदार आहेत अशा ठिकाणांचा अभ्यास करुन याठिकाणी होर्डिंग, रिक्षा, बोर्ड अभियान करण्यात आले. यामधून नागरिकांपर्यंत पोहोचण्यामध्ये करसंकलन विभागाला यश आले आहे. याबरोबरच करदात्यांना सवलतीबाबत, विलंब दंड व महानगरपालिकेच्या अभियानाबाबत 'एसएमएस'द्वारे कळविण्यात आले. त्यासोबतच मालमत्ताकराचा भऱणा करण्यासाठी प्रत्येक मालमत्ताधारकास 'टेलिकॉलिंग'च्या माध्यमातून कर भऱण्याचे आवाहन करण्यात आले.


#### वाकडमधून झाली सर्वाधिक वसुली !

| | |
|---|---|
| वाकड | – 112.54 |
| चिखली | – 109.40 |
| थेरगाव | – 91.26 |
| भोसरी | – 68.66 |
| सांगवी | – 62.87 |

**"नवीन वर्षात नोंदणी न झालेल्या संपुर्ण मालमत्ताधारकांना अंतिम बिल देण्याची कार्यवाही पुर्ण करणे, जप्ती व लिलाव प्रक्रिया सतत सुरु ठेवणे. रहिवाशी मालमत्ताधारकाच्या जंगम मालमत्ता जप्त करणे तसेच त्यांचे शेअरसर्टिफिकेटवर नोंदी घेणे, तसेच रस्ता रुंदीकरणात, संपादनात, अतिक्रमणात नष्ट झालेल्या मिळकतींच्या नोंदी कमी करणे या पंचसुत्रीचा वापर करुन सन २०२५-२६ या आर्थिकवर्षात थकबाकीमुक्त महानगरपालिका करण्याचा संकल्प करण्यात आला असून त्यासाठी विविध माध्यमातून थकीत कर वसूल करण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहोत. चालूवर्षी मालमत्ताकर भरलेल्या सर्वच जागरुक मालमत्ताधारकांचे मी मनापासून आभार मानतो."**

**–अविनाश शिंदे,**
सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग, पिंपरी – चिंचवड महानगरपालिका

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सत्संगतीचे दोन प्रकार

सत्संगती अती अपूर्व काम करणारी आहे. संतांची संगत दोन प्रकारे होऊ शकते. एक, संतांच्या देहाची; दुसरी, संतांनी सांगितलेले साधन करीत राहण्याची. यांपैकी पहिली, म्हणजे संताच्या देहाची संगती लाभणे फार कठीण आणि दुर्मिळ. कारण संत जरी खरा असला तरी त्याला ओळखणे कठीण असते, आणि पुष्कळदा त्याच्या बाह्य वागणुकीवरून मनात विकल्प येण्याचा संभव असतो; आणि एखाद्या भोंदूशीच गाठ पडली तर त्याच्या संगतीपासून नुकसान हे ठरलेलेच. म्हणून पहिला, म्हणजे संताच्या देहाच्या संगतीचा मार्ग, हा पुष्कळदा धोक्याचा ठरण्याचा संभव असतो. दुसऱ्या मार्गाने जाण्यात, म्हणजे त्याने सांगितलेले साधन करण्यात, बिलकूल धोका नसतो; कारण खरा संत काय किंवा भोंदू साधू काय, कोणीही झाला तरी तो दुसऱ्याला सांगताना खरे आणि बरोबर असेल तेच सांगेल. तो भोंदू असला तरी, आपला भोंदूपणा लपविण्याकरिता, जे बरोबर असेल तेच सांगणे त्याला जरूर असते. साधकाने शुद्ध भावनेने ते साधन केले की सत्संगतीचा फायदा मिळून त्याचे काम होते. खऱ्या संताच्या देहाच्या संगतीचा लाभ जर दैववशात् प्राप्त झाला तर मात्र काम बेमालूम होते. ज्या वाहनाचा आपण आश्रय करतो त्या वाहनाचा वेग हा आपला वेग होतो; फक्त त्या वाहनात निश्चल बसून राहणे एवढेच आपले काम असते. तसे आपण खऱ्या संताजवळ नुसते पडून राहावे. संताच्या संगतीत आपली कृती अशी काहीच नसते, नुसते अस्तित्व असते. त्यामुळे अहंकाराला वाव न राहून वासनेचा क्षय व्हायला फार मदत होते. तुकाराम महाराजांनी देवाजवळ धनसंपदा मागितली नाही, मुक्तिदेखील नको असे म्हटले, फक्त संतसंगती दे असे म्हटले. संतसंगाने नाम घेण्याची बुद्धी येते. बुद्धीची स्थिरता ठेवणे हे फक्त नामानेच साधेल. नाम जरूर तेवढे ठेवते आणि बाकीचे नष्ट करून टाकते. पण अनन्यभावाने नाम घ्यावे. नाम घेता घेता बुद्धीला स्थिरता येते; आणि मग मनात विकल्प न येता संतांच्या देहाच्या संगतीचा खरा फायदा घेता येतो. सत्संगतीत कष्टाशिवाय ईश्वरप्राप्ती होते. संतसंगतीत साधने आपोआप होत असतात. त्यांच्या पूजनाबरोबर पूजन, भजनाबरोबर भजन, श्रवणाबरोबर श्रवण, स्मरणाबरोबर स्मरण आपोआप होते. सत्संगतीत स्वतःची विस्मृती होते आणि नामस्मरण घडते. म्हणून प्रयत्नाने संतसंगती करावी. तिथे प्रारब्ध आणू नये. सत्संगतीत राहून नाम घेतले तर देहबुद्धीच्या कोंडीतून बाहेर पडता येते.

**बोधवचन:- संतांना जे आवडते ते आपल्याला आवडणे म्हणजे त्यांचा समागम करणे होय.**



## 'स्टेट'मेंट

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा बुलडोझर संपूर्ण जगात चर्चिला जात आहे. पोलिसांवर ज्या इमारती मधून दगडफेक होई, त्या इमारतीवर काही क्षणात बुलडोझर चालायचा. कुठे दंगल झाली, कोणत्या मशिदीतून शस्त्रे बाहेर आल्याचे कळले, की लगेच बुलडोझरास्त्र ! नागपूर दंगलीच्या वेळी त्यांचा हा फॉर्म्युला चक्क मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आत्मसात केला आणि महाराष्ट्रातही बुलडोझर प्रसिद्धी मिळवू लागला. थोडक्यात काय, गैर कृत्ये करणाऱ्याला लगेच चाप बसण्याचे ते एक मोठे साधन बनले!**

# 'बुलडोझरी' योगींचा इरादा नेक, कोर्टानं लावला दहा लाखाचा ब्रेक!



### पण, सर्वोच्च न्यायालय नाराज!

हे सर्व प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर मात्र दोन दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझरच्या कारवाईबाबत प्रचंड नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने कोर्टाचे अधिकार आपल्या हाती घेऊ नयेत, अशी स्पष्ट आणि दमदार तंबी सर्वोच्च न्यायालयाने दिलेली आहे. ही बाब उत्तर प्रदेश सरकारमधील असली, तरी ती सर्वांनाच लागू होते. दबक्या आवाजात का होईना सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अधिकारावर जे अतिक्रमण झाले आहे, ते सहन केले जाणार नाहीत. हे ही सांगितलेले आहे.

### गुन्हेगार समजूनच कारवाई ?

दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे, ज्यांच्यावर 'बुलडोझर' चालवला गेला आहे. त्यांनी गुन्हा केलाच आहे, असे गृहीत धरून सरकार कारवाई करते. कुठे जागेवर अतिक्रमण आहे, कुठे अवैध बांधकामावर अतिक्रमण आहे. कुठे बळजबरीने घेतलेला ताबा आहे. अशा वेगवेगळ्या कारणांमुळे ही 'बुलडोझरी' कारवाई करण्यात आलेली आहे. थोडक्यात, जे अधिकार न्यायालयाकडे आहेत, ते वेगवेगळे नियम दाखवून सरकारने कारवाया करण्याचे अधिकार आपल्या ताब्यात घेणे. याबद्दल सर्वोच्च न्यायालयाला चीड आलेली आहे. पण असे का होते, याचा विचारही न्यायालयानेच केला पाहिजे.

### न्यायालयात गेलेल्यांसाठी सुद्धा..

एखादे प्रकरण न्यायालयात दाखल झाले की, त्याचा निकाल जेव्हा लागायचा तेव्हाच लागतो. पण, तोपर्यंत जो कोणी न्याय मिळवण्यासाठी न्यायालयात जातो. त्याचाच तोपर्यंत निकाल लागलेला असतो. हे सत्य आहे. अलीकडचेच सांगायचे झाले तर परवा, नागपुरात एका माणसाने चार-पाच वर्षांपूर्वी ज्या व्यक्तीने त्याच्या मुलाचा खून केला होता, त्याला अगदी भर रस्त्यात सपासप वार करून संपवून टाकले. एका बापाचा हा राग स्पष्टपणे न्यायालयाच्या मर्यादा किती आणि कशा आहेत, हे सिद्ध करणारा आहे.

### रिया चक्रवर्तीला न्याय?

नुकताच, अभिनेता सुशांतसिंह राजपूत याच्या प्रकरणात त्याची मैत्रीण रिया चक्रवर्तीवर किती घणाघाती आरोप झाले आणि ते आरोप चघळून चघळून रोज मीडियामध्ये मांडणारे तथाकथित पत्रकार चक्क उघडे पडले. काही दिवस वृत्तवाहिन्यांवर रिया चक्रवर्ती कशी खलनायक आहे, हे बेंबीच्या देठापासून बोंबलणाऱ्या पत्रकारांवर न्यायालयाने चांगलीच चपराक लगावलेली आहे. न्यायालयाने आता रिया चक्रवर्तीला निर्दोष ठरवले आहे. पण, तिच्या ऐन उमेदीच्या काळात जे जे आरोप केले होते, ते फोल ठरल्यावर एकातरी वृत्तवाहिनीवर त्याच न्यायालयाने दोषारोप केला आहे काय?

### नंतर निर्दोष सुटून काय उपयोग ?

आता ती बिचारी निर्दोष सुटली आहे. तरी तिला निर्दोष असतानाही जेलमध्ये जावे लागले, समाजात बदनामी झाली, तिच्या आयुष्याचे सर्व गणितच बिघडले. याला जबाबदार कोण? अशा स्थितीत रिया चक्रवर्तीच्या या साडेपाच वर्षांची भरपाई कशी होणार? या ठिकाणी 'बुलडोझरी' न्याय वापरला असता. तर रियाला पुन्हा बदनामी झेलावी लागली असती! थोडक्यात, आपली न्यायालये कोणत्याही प्रकरणात चघळून चघळून आणि प्रचंड विलंब लावून जो काही न्याय देतात, तो त्यांना तेव्हा मिळतो.

### 'बुलडोझरी' न्यायाची गरज का?

या परिस्थितीमध्ये एक म्हणायचे आहे. ते हे की न्यायालयात जी जी प्रकरणे समोर असतील, त्या त्या प्रकरणाचा निकाल जलद गतीने करणे गरजेचे आहे. तसे झाले तर, कुणालाही 'बुलडोझर' चालवण्याची गरजच पडणार नाही. आता, ज्या ज्या प्रकरणात सरकारने कारवाई केली. त्याचा इतिहास बघितला तर असे दिसते की, सरकारला न्यायालयीन निर्णय वेळेत होणार नाही. याची खात्री असल्यामुळेच असे निर्णय घ्यावे लागले असावेत. म्हणजे न्यायालयाने दिलेल्या निकालाची ही सुद्धा एक बाजूच आहे, असे आपण का ठरवू नये. एका दृष्टीने पाहिले तर हिंदुहृदयसम्राट होऊ पाहणाऱ्या योगीजींना असे निर्णय घेतल्याबद्दल अनेकांनी शाबासकी दिलेलीच आहे, हे सुद्धा लक्षात घ्यायला हवे!

### बूंद से गई, वो हौदसे नहीं आती !

आता न्यायालयाने त्यांच्या आदेशानुसार नुकसान भरपाई दिली. तरी 'जो बूंद से गई, वो हौद से नहीं आती' या सूत्राप्रमाणे एका दिवसात झालेली गोष्ट पुन्हा उभी राहू शकत नाही. मुळातच भरपाई आणि बुलडोझर यांचा बादरायण संबंध जोडला जाऊ शकत नाही. यामध्ये एक गोष्ट मात्र नक्की आहे, ती म्हणजे अशा जबरदस्त कारवाईमुळे उत्तर प्रदेशातील नामचीन गुंड जे आपली गुंडाई, गुंडगिरी राबवत होते, त्यासोबतच अगदी उजळ माथ्याने गुंडपणा करीत होते. ते पार बरबाद झालेले आहेत. न्यायालयाने एखाद्या प्रकरणात ताशेरे झाडले असतील, तरी हरकत नाही. तरी यापुढे असे होणारच नाही. याची खात्री कोणतेही सरकार देणार नाही.

### 'बुलडोझरी' वास्तव..

याचाच सरळ सरळ अर्थ असा, की न्यायालयाच्या विलंबामुळे ज्याच्यावर अन्याय होतो. त्याच्यावरचा अन्याय कधीच पूर्णपणे दूर होत नाही, हे यामधले खरे वास्तव आहे. ज्यांच्या इमारतींवर योगींनी बुलडोझर फिरवला आहे, त्यांना प्रत्येकी दहा लाख रुपये नुकसान भरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. ही रक्कम सरकार त्यांना देईल सुद्धा.. पण, जी इमारत पाडली गेली, तिचे नुकसान किती झाले हा आकडा सुद्धा काढला गेला पाहिजे. पण, कोर्टाच्या या निर्णयामुळे उत्तर प्रदेशात मान खाली घालून बसलेली गुंडगिरी पुन्हा आपली मान वर करणार नाही ना, याचा विचार योगी यांनी केला पाहिजे..अर्थात् बुलडोझर नसला तरी पुढे काय करायचे याचे ठोकताळे आणि नियोजन योगी यांनी करून ठेवलेले असणारच !

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# पडळकरांना मंत्री, मला राज्यपाल करा!

## सदाभाऊ खोत यांनी गोपीचंद पडळकर यांचं कौतुक केलं

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**गोपीचंद पडळकरांना मंत्री करा आणि मला राज्यपाल करा नाहीतर आमची अवस्था बँडवाल्यासारखी होईल असं वक्तव्य सदाभाऊ खोत यांनी केलं आहे. सांगली जिल्ह्यातील विटा या ठिकाणी आमदार गोपीचंद पडळकर यांचा सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी सदाभाऊ खोत उपस्थित होते. यावेळी सदाभाऊ खोत यांनी पडळकर यांचं कौतुक केलं तर मंत्रिपदावरुन खुमासदार टोलाही लगावला.**





जिवाची बाजी लावणारे कार्यकर्ते महाराष्ट्रात कुणाकडे असतील तर त्यांचं नाव आमदार गोपीचंद पडळकर. पडळकरांच्या कार्यकर्त्यांना आज मी धन्यवाद देतो. लाख मेले तरीही चालतील पण लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे ही भावना मनामध्ये बाळगून तुम्ही जीव ओवाळून टाकणारे त्यांचे कार्यकर्ते झाला आहात. आमदार पडळकर यांच्याकडे सत्ता नव्हती तरीही कार्यकर्त्यांनी साथ दिली. जिवाची ढाल करणारे, बाजी लावणारे कार्यकर्ते गोपीचंद पडळकर यांच्याकडे आहेत. असं सदाभाऊ खोत म्हणाले.गोपीचंद पडळकर यांनी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळालं पाहिजे यासाठी संघर्ष केला. गोपीचंद पडळकर मंगळसूत्र चोरणारा नाही तर मंगळसूत्राचं रक्षण करणारा माणूस आहे. योद्धा रणांगणात असेल तर त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न होतो. देवाभाऊ पडळकर यांना मंत्री करतील याची मला खात्री आहे. पडळकरांना मंत्री करा, मला राज्यपाल करा नाहीतर आम्ही बँडवाल्यांसारखे दिसू. बँडवाल्याचं कसं असतं चांगलं गाणं वाजवलं की लोक म्हणतात वन्स मोअर, होऊन जाऊदे पुन्हा. तशी आमची अवस्था झाली आहे असं सदाभाऊ खोत त्यांच्या मिश्किल शैलीत म्हणाले आणि उपस्थितांमध्ये हशा पिकला. गोपीचंद पडळकर म्हणाले, "जयंत पाटील यांचं अजून तळ्यात मळ्यात चाललं आहे. कुठे जायचं ते अजून त्यांचं ठरत नाही. पण आपल्या विरोधात ताकदीने लढायचं हा जयंत पाटील यांचा अजेंडा पक्का आहे." असा टोला पडळकर यांनी लगावला. आता गट, पक्ष, विचार नाही असे म्हणत पडळकर यांनी पुन्हा जयंत पाटील यांनी डिवचले. दुसरीकडे भाजपा शिवाय देशाला, सांगलीला पर्याय नाही. त्यामुळे येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सांगली जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा रोवू असा विश्वास पडळकर यांनी व्यक्त केला.जिवाची बाजी लावणारे कार्यकर्ते महाराष्ट्रात कुणाकडे असतील तर त्यांचं नाव आमदार गोपीचंद पडळकर. पडळकरांच्या कार्यकर्त्यांना आज मी धन्यवाद देतो. लाख मेले तरीही चालतील पण लाखांचा पोशिंदा वाचला पाहिजे ही भावना मनामध्ये बाळगून तुम्ही जीव ओवाळून टाकणारे त्यांचे कार्यकर्ते झाला आहात. आमदार पडळकर यांच्याकडे सत्ता नव्हती तरीही कार्यकर्त्यांनी साथ दिली. जिवाची ढाल करणारे, बाजी लावणारे कार्यकर्ते गोपीचंद पडळकर यांच्याकडे आहेत. असं सदाभाऊ खोत म्हणाले.गोपीचंद पडळकर यांनी दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळालं पाहिजे यासाठी संघर्ष केला. गोपीचंद पडळकर मंगळसूत्र चोरणारा नाही तर मंगळसूत्राचं रक्षण करणारा माणूस आहे. योद्धा रणांगणात असेल तर त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न होतो. देवाभाऊ पडळकर यांना मंत्री करतील याची मला खात्री आहे. पडळकरांना मंत्री करा, मला राज्यपाल करा नाहीतर आम्ही बँडवाल्यांसारखे दिसू. बँडवाल्याचं कसं असतं चांगलं गाणं वाजवलं की लोक म्हणतात वन्स मोअर, होऊन जाऊदे पुन्हा. तशी आमची अवस्था झाली आहे असं सदाभाऊ खोत त्यांच्या मिश्किल शैलीत म्हणाले आणि उपस्थितांमध्ये हशा पिकला.

### आमची अवस्था बँडवाल्यासारखी

गोपीचंद पडळकर म्हणाले, "जयंत पाटील यांचं अजून तळ्यात मळ्यात चाललं आहे. कुठे जायचं ते अजून त्यांचं ठरत नाही.असाही टोला पडळकर यांनी लगावला. आता गट, पक्ष, विचार नाही असे म्हणत पडळकर यांनी पुन्हा जयंत पाटील यांनी डिवचले. दुसरीकडे भाजपा शिवाय देशाला, सांगलीला पर्याय नाही. त्यामुळे येत्या काळात होणाऱ्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत सांगली जिल्हा परिषदेवर भाजपचा झेंडा रोवू असा विश्वास पडळकर यांनी व्यक्त केला.गोपीचंद पडळकरांना मंत्री करा आणि मला राज्यपाल करा नाहीतर आमची अवस्था बँडवाल्यासारखी होईल असं वक्तव्य सदाभाऊ खोत यांनी केलं आहे.

# चुलत्याच्या कृपेने आमचं बरं चाललंय!

## सोशल मीडियाचा वापर चांगल्या पद्धतीने करा-अजित पवार

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आज बीड दौऱ्यावर आहेत. आपल्या बीडमधील भाषणात त्यांनी युवकांना उद्देशून अनेक मोलाचे सल्ले दिले. बोलताना भान बाळगा हे सांगत असतानाच पुढाऱ्यांच्या पाया पडायचं असेल तर त्याची हिस्ट्री आठवा असाही सल्ला दिला. तसंच माझ्या पाया पडायला येऊ नका, हार, टोप्या, मानचिन्ह काही देऊ नका, चुलत्याच्या कृपेने आमचं बरं चाललं आहे असंही म्हणाले. अजित पवारांनी शरद पवारांचं नाव घेतलं नाही पण त्यांचा उल्लेख केला.**






आपल्याला पुढे जायचं असेल तर सर्वधर्म समभाव जपला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना सगळ्या समाजांना घेऊन स्वराज्याची स्थापना केली. विशिष्ट समाजाचेच लोक महाराजांच्या दरबारी होते असं काहीजण सांगतात त्याला काही अर्थ नाही. महाराजांच्या दरबारी अल्पसंख्याक समाजातलेही लोक होते. एका धार्मिक स्थळाजवळ जिलेटिन उडवण्यात आलं ही विकृती आहे असं अजित पवार म्हणाले. अनेकदा सोशल मीडियाचाही वापर चांगल्या पद्धतीने होत नाही. WHAT'S APP वरुन काहीतरी मेसेज करायचे. चुकीचं काहीतरी पाठवायचं. आमचे नेते म्हणजे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार पदावर बसले आहेत. त्यामुळे आता मला कोण काय बोलणार आहे? या गैरसमजात राहू नका. मेसेज डिलिट केला तरीही सगळे मेसेज मिळतात. अशा गोष्टी केल्या आणि अडकलात तर मी सोडवायला येणार नाही. काही लोकांना तर मी मकोका लावायला सांगितला आहे. मी कुणाचीही दादागिरी खपवून घेणार नाही हे लक्षात ठेवा असाही इशारा अजित पवारांनी दिला.राख गोळा करणारी गँग, वाळू तस्करीची गँग, भूखंड गँग या सगळ्या गँगना सुतासारखं सरळ करणार, कुणाच्याही दबावाला तुम्ही घाबरु नका. आज मी महसूल खात्याच्या सचिवालाही आणलं आहे. मी सगळी यंत्रणा व्यवस्थित राबवतो, तुम्हाला कळेल कामाचा वेग वाढला आहे. रस्ता नुसता मंजूर करुन जो बिलं काढेल त्याला नाही मातीत घातला तर बोला. असंही अजित पवार म्हणाले.शाली आणू नका, टोप्या घालू नका, हार घालू नका नमस्कार करा तेवढं बरं वाटेल. जेवढा मोठा हार तेवढी भीती वाटते. याने काहीतरी केलंय त्यामुळे हाराचा बोजा आहे आता आमच्यावर. आई-बापाच्या कृपेने, चुलत्याच्या कृपेने बरं चाललं आहे.

### पुढाऱ्यांच्या पाया पडू नका

आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत. ज्याच्या पाया पडता त्याची हिस्ट्री आठवा तुम्हीच म्हणाल मी कुणाच्या पाया पडलो, आई-बापांच्या पाया पडा, गुरुंच्या पाया पडा, पुढाऱ्यांच्या पाया पडू नका. असंही अजित पवार त्यांच्या भाषणात म्हणाले. यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील ही आभाळाएवढी माणसं होती.

# भारताला मुस्लिम राष्ट्र बनवायचे आहे का?

## वफ्क विधेयकावरील चर्चेदरम्यान भाजपा खासदाराचा सवाल

। ओडिशा।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान आज केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांनी वक्फ दुरूस्ती विधेयक सादर केले. यानंतर दुपारपासून या विधेयकावर सभागृहात चर्चा सुरू आहे. दरम्यान सत्ताधारी मंत्री आणि खासदारांनी या विधेयकाच्या बाजून मते व्यक्त केली आहेत. तर, विरोधी पक्षांच्या खासदारांनी याला विरोध केला आहे.**



झारखंडमधील गोड्डा लोकसभा मतदारसंघाचे खासदार निशिकांत दुबे यांनी वक्फ विधेयकावरील चर्चेत, वक्फ बोर्डात गैर-मुस्लिमांचा समावेश का असावा असा प्रश्न करणाऱ्या विरोधी पक्षाच्या खासदारांना लक्ष्य केले. यावेळी दुबे यांनी असा प्रश्न केला की, जर गैर-मुस्लिम लोक वक्फ बोर्डाला मोठे दान करू शकतात, मक त्यांच्यापैकी कोणी बोर्डात का असू शकत नाही?यावेळी बोलताना निशिकांत दुबे यांनी दावा केला की, “भारतात मुहम्मद घोरी यांनी वक्फ सुरू केले. जिन्नांनी पाकिस्तानची निर्मिती केली आणि आज पुन्हा एकदा वक्फच्या नावाखाली समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहेत.”“१९५४ मध्ये संसदेच्या सदस्यांनी विधेयकाला विरोध करूनही, काँग्रेस पक्षाने मुस्लिमांना खुश करण्यासाठी वक्फ कायदा मंजूर केला. वक्फला दुसऱ्या कोणत्याही देशात असे अधिकार देण्यात आले नाहीत, तुम्हाला भारताला मुस्लिम राष्ट्र बनवायचे आहे का?”, असा सवालही भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी यावेळी केला.वफ्क दुरूस्ती विधेयकावर बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत म्हटले की, “महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे गावातील महादेव मंदिरावर वक्फ बोर्डाने दावा केला होता. याचबरोब बीडमधील कंकालेश्वर मंदिराची १२ एकर जमीन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली होती.”दुसरीकडे या विधेयकाला विरोधी पक्षांनी कडकडून विरोध केला आहे. यामध्ये काँग्रेस खासदार गौरव गौगोई, शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार अरविंद सावंत, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी सभागृहातून याला विरोध केला.जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनी सभागृहाबाहेरून यावर टीका केली. त्या म्हणाल्या “ते (भाजपा) विसरले आहेत की, आज त्यांचे सरकार आहे पण उद्या त्यांचे सरकार राहणार नाही. ते जाईपर्यंत संपूर्ण देश उद्ध्वस्त झालेला असेल. सध्या सत्तेत असलेले भाजपा सरकार मुस्लिमांच्या हक्कांचे उल्लंघन करत आहे. येत्या काळात संपूर्ण देशाला याचे परिणाम भोगावे लागतील.”झारखंडमधील गोड्डा लोकसभा मतदारसंघाचे खासदार निशिकांत दुबे यांनी वक्फ विधेयकावरील चर्चेत, वक्फ बोर्डात गैर-मुस्लिमांचा समावेश का असावा असा प्रश्न करणाऱ्या विरोधी पक्षाच्या खासदारांना लक्ष्य केले. यावेळी दुबे यांनी असा प्रश्न केला की, जर गैर-मुस्लिम लोक वक्फ बोर्डाला मोठे दान करू शकतात, मक त्यांच्यापैकी कोणी बोर्डात का असू शकत नाही?यावेळी बोलताना निशिकांत दुबे यांनी दावा केला की, “भारतात मुहम्मद घोरी यांनी वक्फ सुरू केले. जिन्नांनी पाकिस्तानची निर्मिती केली आणि आज पुन्हा एकदा वक्फच्या नावाखाली समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू आहेत.”“१९५४ मध्ये संसदेच्या सदस्यांनी विधेयकाला विरोध करूनही, काँग्रेस पक्षाने मुस्लिमांना खुश करण्यासाठी वक्फ कायदा मंजूर केला.

### मंदिराची जमीन ताब्यात घेतली

तुम्हाला भारताला मुस्लिम राष्ट्र बनवायचे आहे का?”, असा सवालही भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी यावेळी केला. गृहमंत्री अमित शाह यांनी आज लोकसभेत म्हटले की, “महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे गावातील महादेव मंदिरावर वक्फ बोर्डाने दावा केला होता. याचबरोब बीडमधील कंकालेश्वर मंदिराची १२ एकर जमीन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली होती.”दुसरीकडे या विधेयकाला विरोधी पक्षांनी कडकडून विरोध केला आहे. यामध्ये काँग्रेस खासदार गौरव गौगोई, शिवसेना (उद्धव ठाकरे) खासदार अरविंद सावंत, समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी सभागृहातून याला विरोध केला.

# १०० हून अधिक औषधे महागली!

## मलेरियावरील टॅब्लेटसह अॅन्टीबायोटिक्सच्या किंमतीत वाढ

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देशातील सर्वसामान्य जनतेसाठी एक वाईट बातमी समोर आली आहे. या महिन्यापासून ९०० हून अधिक अत्यावश्यक औषधांच्या किंमती १.७४ टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे लोकांचा औषधांवरील खर्च वाढणार आहे. यामध्ये संसर्ग (इन्फेक्शन), मधुमेह व हृदयाशी संबंधित आजारांवरील औषधांचा समावेश आहे.**





केंद्र सरकारच्या रसायन व खते मंत्रालयाच्या अखत्यारित येणारी राष्ट्रीय फार्मास्युटिकल प्रायसिंग अथॉरिटी (एनपीपीए) अत्यावश्यक औषधांच्या किंमती ठरवते. औषधांच्या किंमती या मागील वर्षाच्या घाऊक किंमत निर्देशांक (डब्ल्यूपीआय) लक्षात घेऊन वाढवल्या जातात.एनपीपीएने यासंबंधीचं एक निवेदन जारी केलं आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की कॅलेंडर वर्ष २०२३ च्या तुलनेत २०२४ मध्ये डब्ल्यूपीआयमध्ये १.७४०२८ टक्के बदल झाला आहे. औषध उत्पादक कंपन्या याच डब्ल्यूपीआयच्या आधारावर अनुसूचित फॉर्म्यूलेशनची कमाल किरकोळ किंमत वाढवू शकतात आणि यासाठी सरकारच्या पूर्वपरवानगीची आवश्यकता नसते.

मलेरिया, अॅन्टीव्हायरल (विषाणूविरोधी) औषधे व प्रतिजैविकांच्या (अॅन्टीबायोटिक) किंमती वाढणार आहेत. केंद्र सरकारच्या आदेशानंतर अॅन्टीबायोटिक औषध अजिथ्रोमायसिनची किंमत प्रति टॅब्लेट ११.८७ रुपये (२५० मिलिग्रॅम) आणि २३.९८ रुपये (५०० मिलिग्रॅम) इतकी असेल. अमोक्सिसिलिन व क्लेव्हुलेनिक अॅसिडच्या फॉर्म्युलेशनसह अॅन्टीबॅक्टेरियल ड्राय सिरपची किंमत २.०९ रुपये प्रति मिली इतकी असेल. एसायक्लोव्हिरसारख्या अॅन्टीव्हायरल औषधाची किंमत ७.७४ रुपये (२०० मिलीग्रॅम) आणि १३.९० रुपये (४०० मिलीग्रॅम) प्रति टॅब्लेट इतकी असेल. तर, मलेरियावरील उपचारांसाठी घेतल्या जाणाऱ्या हायड्रॉक्सीक्लोरोक्वीनची किंमत प्रति टॅब्लेट ६.४७ रुपये (२०० मिलीग्रॅम) व १४.०४ रुपये (४०० मिलिग्रॅम) इतकी असेल.वेदनेपासून आराम देण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या डायक्लोफेनाकची किंमत आता २.०९ रुपये प्रति टॅब्लेट इतकी असेल. तर इबुप्रोफेनसाठी प्रति टॅब्लेट ०.७२ रुपये (२०० एमजी) व १.२२ रुपये (४०० एमजी) मोजावे लागतील. एनपीपीएने अत्यावश्यक औषधांच्या यादीमधील १,००० हून अधिक औषधांच्या किंमती वाढवण्यास मान्यता दिली आहे.

### एनपीपीएने निवेदन जारी केलं

केंद्र सरकारच्या रसायन व खते मंत्रालयाच्या अखत्यारित येणारी राष्ट्रीय फार्मास्युटिकल प्रायसिंग अथॉरिटी (एनपीपीए) अत्यावश्यक औषधांच्या किंमती ठरवते. औषधांच्या किंमती या मागील वर्षाच्या घाऊक किंमत निर्देशांक (डब्ल्यूपीआय) लक्षात घेऊन वाढवल्या जातात.एनपीपीएने यासंबंधीचं एक निवेदन जारी केलं आहे.

# गोविंदा आणि सुनीता अनेक वर्षांपासून एकत्र राहत नाहीत



मरते दम तक', 'किस्मत', 'राजा बाबू', 'हीरो नंबर १', 'आंटी नंबर १' या आणि अशा अनेक लोकप्रिय चित्रपटांमधून प्रेक्षकांच्या भेटीला आलेला सुप्रसिद्ध बॉलीवूड अभिनेता म्हणजे गोविंदा (GOVINDA). ९० च्या दशकात आपल्या बहारदार अभिनयाने व नृत्याने त्याने प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. त्याच्या विनोदी भूमिकांना तर प्रेक्षकांची विशेष पसंती मिळाली. आपल्या अभिनयाने व नृत्याने चर्चेत राहणारा गोविंदा गेल्या काही दिवसांपासून त्याच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आला आहे. काही दिवसांपासून गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा (SUNITA AHUJA) घटस्फोट घेणार असल्याच्या चर्चा होताना पाहायला मिळत आहेत. गोविंदा आणि सुनीता यांनी घटस्फोटाच्या बातम्यांचे खंडन केले होते. पण गोविंदाच्या वकिलाने एका निवेदनात म्हटले होते की, सुनीताने ६ महिन्यांपूर्वी घटस्फोटासाठी अर्ज केला होता. ही घटना ६ महिने जुनी आहे आणि आता त्यांच्यात सर्व काही ठीक आहे. दोघांच्या नात्यात सारं काही आलबेल असलं तरी गोविंदा आणि सुनीता कधीही एकत्र दिसत नाहीत. अनेक कार्यक्रमांना त्यांची एकत्र उपस्थिती नसते. नुकत्याच मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात सुनीता सहभागी झाली होतीयावेळी तिच्याबरोबर मुलगा यशवर्धन आणि मुलगी टीनाही होती, पण गोविंदा मात्र कुठेच दिसला नाही. दोघांच्या या एकत्र राहण्याबद्दल आता गोविंदाचे जवळचे मित्र टिनू वर्मा यांनी भाष्य केले आहे. 'फिल्मी मंत्रा'ला दिलेल्या मुलाखतीत टिनू वर्मा यांनी गोविंदा आणि सुनीता आहुजा यांच्या घटस्फोटाच्या चर्चांवर तसेच अभिनेत्याच्या गोळीबाराबद्दलही भाष्य केलं आहे. 'सुनीता आहुजा आणि गोविंदा घटस्फोट घेणार आहेत असे म्हटले जात आहे. तर हे घडणार आहे का? किंवा घडले आहे का? कारण ते एकत्र राहत नाहीत' असा प्रश्न त्यांना विचारण्यात आला.

# शाहरूखच्या पत्नीने विकले मुंबईतील घर

बॉलीवूडचा किंग खान म्हणजेच शाहरूख खान(SHAH RUKH KHAN) लवकरच 'किंग' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात त्याची लेक सुहाना खानदेखील दिसणार आहे. या चित्रपटात अभिषेक बच्चनदेखील प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. आता 'डंकी' या चित्रपटानंतर शाहरूख प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याने या चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. याबरोबरच अभिनेता शाहरुख खानने मन्नत या त्याच्या २७ हजार स्क्वेअर फूट सी-फेसिंग बंगल्याचे नूतनीकरण करणार आहे. त्यासाठी तो आपल्या कुटुंबासह भाड्याच्या एका अपार्टमेंटमध्ये शिफ्ट होणार असल्याची माहिती समोर आली होती. अशातच अभिनेत्याची पत्नी गौरी खानने नुकतेच मुंबईमधील दादर पश्चिम येथील अपार्टमेंट विकले आहे. जाणून घेऊयात हे अपार्टमेंट किधी व किती किंमतीला विकले होते, तसेच आता हे अपार्टमेंट किती रूपयांना विकले आहे.स्क्वेअर याईसकडे असलेल्या नोंदणी कागदपत्रांनुसार गौरी खानने हा फ्लॅट ऑगस्ट २०२२ मध्ये ८.५ कोटींना विकत घेतला होता. आता हा फ्लॅट ११. ६१ कोटींना विकला आहे. गौरी खानला या व्यवहारात तीन वर्षांत ३७ टक्के फायदा झाला आहे. हा फ्लॅट कोहिनूर सीटीएनएल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनी प्रायव्हेट लिमिटेडने विकसित केलेल्या कोहिनूर अल्टिसिमा येथे आहे.



# मी वाईट पुरूषांबरोबरही काम केलं

झगमगत्या विश्वातील ग्लॅमरमागे सेलिब्रिटींना अनेकदा काही वाईट प्रसंगांचा सामना करावा लागतो. सिनेविश्वात स्वतःची ओळख निर्माण करताना अभिनेत्रींना अनेक अडचणींतून जावं लागतं. याबद्दल पूर्वी अभिनेत्री समोर येऊन प्रतिक्रिया देत नसत; पण आता अनेक कलाकार अशा घटनांबद्दल व्यक्त होताना दिसतात. मनोरंजन विश्वात काम करताना अनेक अभिनेत्री त्यांच्याबद्दलच्या वाईट घटनांबद्दल मत उघडपणे व्यक्त करतात. अशातच अभिनेत्री शालिनी पांडेने (SHALINI PANDEY) तिच्याबरोबर घडलेला वाईट अनुभव शेअर केला आहे. अभिनेत्री शालिनी पांडेने 'महाराज' आणि 'डब्बा कार्टेल'सारख्या लोकप्रिय कलाकृतींमधून स्वतःची ओळख निर्माण केली आहे. अलीकडेच एका मुलाखतीत अभिनेत्रीने एका दाक्षिणात्य दिग्दर्शकाबद्दल एक धक्कादायक किस्सा शेअर केला. चित्रपटाच्या सेटवर शालिनी आपल्या व्हॅनिटी व्हॅनमध्ये कपडे बदलत होती. तेव्हा दिग्दर्शकाने न विचारता, व्हॅनिटीमध्ये येण्याचा प्रयत्न केला. या प्रसंगानंतर अभिनेत्रीच्या मनावर खूप परिणाम झाला. याच प्रसंगाबद्दल तिने तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.'फिल्मीज्ञान'शी बोलताना या प्रसंगाबद्दल शालिनी म्हणाली, "मी एका दक्षिण चित्रपटात काम करीत होते. तेव्हा दिग्दर्शक माझ्या व्हॅनमध्ये आला. त्यानं दार ठोठावलं नाही आणि मी कपडे बदलत होते. तो थेट दार उघडून आत आला. तेव्हा मी २२ वर्षांची होते. मी घाबरले आणि त्याच्यावर ओरडले. माझ्याबरोबर हे असं काही घडेल असं मला कधीच वाटलं नव्हतं. मी लोकांना रागावलेल्या व्यक्तीसारखी दिसत असे. पण, स्वतःचं रक्षण करण्यासाठी मला काही गोष्टी कराव्या लागल्या."पुढे तिने म्हटले, "मी माझ्या कारकिर्दीत फक्त चांगल्या पुरुषांबरोबरच काम केलं आहे, असं नाही.

# 'लापता लेडीज'वर कथा चोरल्याचा आरोप

किरण रावच्या 'लापता लेडीज' चित्रपटाचं जगभरातून खूप कौतुक करण्यात आलं. या चित्रपटाला आणि त्यामधील कलाकारांना बऱ्याच पुरस्कारांनी गौरविण्यात आलं. एवढंच नव्हे तर 'लापता लेडीज' चित्रपट ९७व्या ऑस्कर पुरस्कार सोहळ्यात पाठवण्यात आला होता. तसंच गेल्या महिन्यात पार पडलेल्या 'आयफा पुरस्कार २०२५' मध्येही 'लापता लेडीज' चित्रपटाने तब्बल १० पुरस्कार जिंकले. असा हा सर्व स्तरातून कौतुक झालेला किरण रावचा चित्रपट एका विदेशी चित्रपटाची कॉपी असल्याचं म्हटलं जातं आहे. 'लापता लेडीज' चित्रपटाची कथा चोरल्याचा आरोप नेटकरी किरण राववर करत आहेत. 'बुर्खा सिटी' नावाच्या विदेशी चित्रपटाची कॉपी किरण रावने केल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. सोशल मीडियावर काही पोस्ट व्हायरल झाल्या आहेत; ज्यामध्ये 'लापता लेडीज'ची कथा चोरल्याचं म्हटलं जात आहे. तेव्हापासून किरण रावचा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला आहे. 'रेडिट'च्या पोस्टमुळे हा वाद निर्माण झाला आहे.'रेडिट'वरील काही पोस्टमध्ये FABRICE BRACQ ची १९ मिनिटांची शॉर्ट फिल्म 'बुर्खा सिटी'चा एक व्हिडीओ शेअर केला आहे. मिडल इस्टवर आधारित या चित्रपटात एक नवविवाहित पुरुषाची कथा आहे; ज्याच्या बायकोची बुरख्यामुळे आदला-बदली होते. त्यानंतर तो आपल्या बायकोला शोधण्यासाठी निघतो. त्यामुळेच अनेक नेटकऱ्यांना 'बुर्खा सिटी'ची कथा 'लापता लेडीज' चित्रपटासारखी वाटतं आहे. दोघांमध्ये फरक एवढाचं आहे की, 'लापता लेडीज'मध्ये घूंघट आहे आणि 'बुर्खा सिटी'मध्ये बुर्खा आहे.





# मोहम्मद सिराजची भावुक घरवापसी!

## जुन्या संघाविरुद्ध 3 विकेट्स घेत दमदार कामगिरी केली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**'खरं सांगायचं तर माझ्या कारकिर्दीत विराट कोहलीची भूमिका अतिशय मोलाची आहे. मी कठीण कालखंडातून जात असताना २०१८ आणि २०१९ मध्ये त्याने मला साथ दिला. नेहमी पाठिंबा दिला. विराटमुळेच बंगळुरूने मला रिटेन केलं. त्यानंतरच माझी कामगिरी बहरली. कारकिर्दीचा आलेख चढताच राहिला. आरसीबीची साथ सोडणं हा माझ्यासाठी अतिशय भावुक करणारा क्षण होता. मी या संघासाठी ७ वर्ष खेळलो.**



आरसीबीसाठी खेळलेल्या प्रत्येक सामन्याला चाहत्यांनी भरभरून पाठिंबा दिला. त्यांचं प्रचंड प्रेम लाभलं. आरसीबीविरुद्ध खेळणं हा माझ्यासाठी सर्वस्वी नवा अनुभव असेल', असं सिराजने गुजरात टायटन्सच्या एका व्हीडिओदरम्यान सांगितलं होतं. सात वर्ष आरसीबीचं प्रमुख अस्त्र असलेल्या सिराजनेच बुधवारी गुजरातच्या विजयाचा मार्ग सुकर केला.आरसीबीसाठी सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्यांच्या यादीत तो तिसऱ्या स्थानी आहे. आरसीबीसाठी खेळतानाच त्याने सलग दोन निर्धाव षटकं टाकण्याचा पराक्रम केला होता. आरसीबीसाठी त्याने ८७ सामन्यात ८३ विकेट्स घेतल्या आहेत. लिलावात गुजरात टायटन्स संघाने १२.२५ कोटी रुपये खर्चून सिराजला ताफ्यात दाखल केलं. गुजरातचे प्रशिक्षक आशिष नेहरा यांचं बारीक लक्ष गोलंदाजी विभागाकडे असतं. सिराजचा वेग, अचूकता आणि गोलंदाजीतलं वैविध्य कामी येईल हे हेरून त्यांनी सिराजला संघात घेतलं.बुधवारी झालेल्या लढतीत सिराजने ३ विकेट्स पटकावत बंगळुरूला दणका दिला. सिराजलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. त्यानंतर बोलताना तो म्हणाला, 'मी आरसीबीसाठी सात वर्ष खेळलो. सामना खेळायला आलो तेव्हा मनात थोडं दडपण होतं. पण जसं सामना सुरू झाला गुजरातला जिंकून देणं हे माझं उद्दिष्ट होतं. मी ख्रिस्तियानो रोनाल्डोचा चाहता आहे त्यामुळे विकेट मिळाल्यानंतर मी त्याच्यासारखं सेलिब्रेशन करतो. मी सातत्याने खेळत होतो त्यामुळे माझ्या हातून काय चुका होत आहेत हे लक्षात आलं नाही. विश्रांती काळात मी गोलंदाजीवर काम केलं. फिटनेस सुधारला. गुजरातच्या कॅम्पमध्ये दाखल झालो तेव्हा प्रशिक्षक आशिष नेहरा यांच्याशी बोलणं झालं. खेळाचा आनंद लूट असं त्यांनी मला सांगितलं. मी तेच केलं आणि यश मिळालं. कागिसो रबाडा, इशांत शर्मा आणि बाकी सगळ्या गोलंदाजांशी बोलणं होतं. त्यांच्याकडून खूप काही शिकायला मिळतं. गोलंदाज म्हणून विकेट पटकावण्याचा विश्वास असणं महत्त्वाचं आहे. फलंदाज चौकार-षटकार लगावणार पण त्याने खचून जायची गरज नाही. मी संघाच्या विजयात योगदान देऊ शकतो हे माझं पक्कं असतं'. बुधवारी सिराजने बंगळुरूच्या धोकादायक फिल सॉल्टला माघारी धाडलं. सॉल्टला एकदा जीवदान मिळालं होतं पण त्याला त्याचा फायदा उठवता आला नाही. देवदत्त पड्डीकलला त्रिफळाचीत केलं. अर्धशतक करून स्थिरावलेल्या लायम लिव्हिंगस्टोनला सिराजनेच बाद केलं. ४ षटकात अवघ्या १९ धावांच्या मोबदल्यात सिराजने ३ विकेट्स पटकावल्या आणि गुजरातच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली.आरसीबीसाठी खेळलेल्या प्रत्येक सामन्याला चाहत्यांनी भरभरून पाठिंबा दिला. त्यांचं प्रचंड प्रेम लाभलं. आरसीबीविरुद्ध खेळणं हा माझ्यासाठी सर्वस्वी नवा अनुभव असेल', असं सिराजने गुजरात टायटन्सच्या एका व्हीडिओदरम्यान सांगितलं होतं.

### सिराजने बंगळुरूला दणका दिला

सात वर्ष आरसीबीचं प्रमुख अस्त्र असलेल्या सिराजनेच बुधवारी गुजरातच्या विजयाचा मार्ग सुकर केला.आरसीबीसाठी सर्वाधिक विकेट्स पटकावणाऱ्यांच्या यादीत तो तिसऱ्या स्थानी आहे. आरसीबीसाठी खेळतानाच त्याने सलग दोन निर्धाव षटकं टाकण्याचा पराक्रम केला होता. आरसीबीसाठी त्याने ८७ सामन्यात ८३ विकेट्स घेतल्या आहेत. लिलावात गुजरात टायटन्स संघाने १२.२५ कोटी रुपये खर्चून सिराजला ताफ्यात दाखल केलं. गुजरातचे प्रशिक्षक आशिष नेहरा यांचं बारीक लक्ष गोलंदाजी विभागाकडे असतं. सिराजचा वेग, अचूकता आणि गोलंदाजीतलं वैविध्य कामी येईल हे हेरून त्यांनी सिराजला संघात घेतलं.बुधवारी झालेल्या लढतीत सिराजने ३ विकेट्स पटकावत बंगळुरूला दणका दिला. सिराजलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. त्यानंतर बोलताना तो म्हणाला, 'मी आरसीबीसाठी सात वर्ष खेळलो. सामना खेळायला आलो तेव्हा मनात थोडं दडपण होतं.

---

# बटलर, सुदर्शन यांची मॅरेथॉन भागीदारी

## गुजरातने बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर विजय साकारला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**दमदार सांघिक खेळाच्या जोरावर गुजरात टायटन्स संघाने बंगळुरूच्या चिन्नास्वामी स्टेडियमवर दणदणीत विजय साकारला. गुजरातने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. गुजरातच्या गोलंदाजांनी शिस्तबद्ध मारा करत बंगळुरूला १६९ धावातच रोखलं. छोट्या स्टेडियमवर जोस बटलर आणि साई सुदर्शन यांनी मॅरेथॉन भागीदारी साकारत विजयाचा पाया रचला. सुदर्शनचं अर्धशतक अवघ्या एका धावेनं हुकलं.**



अर्शद खानने विराट कोहलीला बाद करत बंगळुरूला पहिला धक्का दिला. फिल सॉल्टला जोस बटलरने जीवदान दिलं पण तो याचा फायदा उठवू शकला नाही. त्याने १४ धावा केल्या. मोहम्मद सिराजने त्याला बाद केलं. सिराजनेच देवदत्त पड्डीकलला माघारी धाडलं. पॉवरप्लेच्या षटकांचा बंगळुरू फायदा उठवू शकलं नाही. रजत पाटीदार स्थिरावलाय असं वाटत असतानाच इशांत शर्माने त्याला बाद केलं. यानंतर लायम लिव्हिंगस्टोन आणि जितेश शर्मा यांनी सहाव्या विकेटसाठी ३८ चेंडूत ५२ धावांची भागीदारी केली. साईकिशोरच्या गोलंदाजीवर आक्रमण करण्याचा जितेशचा प्रयत्न फसला. त्याने २१ चेंडूत ३३ धावांची खेळी केली. जितेशच्या जागी आलेल्या टीम डेव्हिडने लिव्हिंगस्टोनला चांगली साथ दिली. लिव्हिंगस्टोनने ४० चेंडूत १ चौकार आणि ५ षटकारांसह ५५ धावांची खेळी केली. टीम डेव्हिडने १८ चेंडूत ३२ धावा केल्या. या तिघांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे बंगळुरूने १६९ धावांची मजल मारली. मोहम्मद सिराजने ३ तर साई किशोरने २ विकेट्स घेतल्या.या छोटेखानी लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातचा कर्णधार शुबमन गिल झटपट बाद झाला. पण यानंतर साई सुदर्शन-जोस बटलर जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ४७ चेंडूत ७५ धावांची भागीदारी करत बंगळुरूच्या गोलंदाजांना निरुत्तर केलं. हेझलवूडने सुदर्शनला बाद केलं. सुदर्शन बाद झाल्यावर बटलरने सामन्याची सूत्रं हाती घेतली. शेरफन रुदरफोर्डने त्याला चांगली साथ देत गुजरातच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. बटलरने ३९ चेंडूत ५ चौकार आणि ६ षटकारांसह नाबाद ७३ धावांची खेळी केली. रुदरफोर्डने १८ चेंडूत ३० धावांची खेळी करत बटलरला चांगली साथ दिली.

### साई किशोरने 2 विकेट्स घेतल्या

फिल सॉल्टला जोस बटलरने जीवदान दिलं पण तो याचा फायदा उठवू शकला नाही. त्याने १४ धावा केल्या. मोहम्मद सिराजने त्याला बाद केलं. सिराजनेच देवदत्त पड्डीकलला माघारी धाडलं. पॉवरप्लेच्या षटकांचा बंगळुरू फायदा उठवू शकलं नाही. रजत पाटीदार स्थिरावलाय असं वाटत असतानाच इशांत शर्माने त्याला बाद केलं.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। गुरुवार ।
। दि. 3 एप्रिल 2025।



# Moaraya Shikshan Sanstha
# Computer Vacation Batch 2024-25

ADMISSION OPEN

## Second Batch
From 5th April 2025
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday

For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students

'C' Language
Fees: 1300/-

Corel Draw
Fees: 1100/-

'C++' Language
Fees: 1300/-

Adobe Photoshop
Fees : 1100/-



Basic Java
Fees : 1300/-

Basic Tally
Fees : 1500

Scratch Animation
Fees : 1300/-

M.S. Office
Fees : 1500/-

Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool

## औद्योगिक सुरक्षा सप्ताह स्पर्धात

# 65 कंपन्यातील 516 स्पर्धकांचा सहभाग!

### उद्योग विश्व : क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, पुणे चॅप्टरचा पुढाकार

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड: क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया, पुणे चॅप्टरच्या वतीने औद्योगिक सुरक्षा सप्ताह 2025 स्पर्धा क्वालिटी सर्कल एक्सलन्स सेंटर, भोसरी येथे संपन्न झाली. त्यात कंपन्यानी उस्फुर्त सहभाग नोंदविला.**




यात 65 कंपन्यामधील 516 स्पर्धक सहभागी झाले. एकूण 268 नामांकनं प्राप्त झाली, त्यामध्ये 74 केस स्टडीज, 22 नाट्य सादरीकरणे, 108 पोस्टर्स आणि 64 घोषवाक्ये यांचा समावेश होता.

या स्पर्धेचे उद्घाटन मुख्य अतिथी शिवराज पाटील (मुख्य कार्यकारी अधिकारी, मिंडा कॉर्पोरेशन लि. – डाय कास्टिंग विभाग) यांच्या शुभहस्ते दिपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी क्वॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या संचालिका डॉ. रजनी इंदुलकर, तसेच पुणे चॅप्टरचे कौन्सिल सदस्य माधव बोरवणकर, अनंत क्षीरसागर आणि भूपेश मॉल उपस्थित होते .

समारोप सत्रात मुख्य अतिथी प्रसाद फुलगिरकर (हेड, अॅक्सल आणि गिअर फॅक्टरी, टाटा मोटर्स लि., टाटा मोटर्स कमर्शियल व्हेईकल, पुणे) होते. त्याच्यासमवेत पारितोषिक वितरण प्रसाद फुलगिरकर, क्वॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडियाच्या संचालिका डॉ. रजनी इंदुलकर, तसेच पुणे चॅप्टर कौन्सिल सदस्य माधव बोरवणकर, अनंत क्षीरसागर, धनंजय वाघोलिकर, श्रीमती. परवीन तरफदार आणि भूपेश मॉल तसेच या स्पर्धेचे परीक्षकांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्याना सुवर्ण , रजत , व कास्य स्वरूपात स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भूपेश मॉल यांनी केले, तर प्रशांत बोराटे आणि चंद्रशेखर रुमाले यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन केले.



KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**



Approved by AICTE | B+ NAAC Accredited
Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University



## ADMISSIONS OPEN

2 Years' Full Time Postgraduate Courses
& 3/4 years' Full time Undergraduate Courses

Sharpen your leadership skills through

**MBA** — Master of Business Administration

**MCA** — Master of Computer Appplications

Join PIBM to become a competent professional ....

- International Certifications
- Live Industry Projects
- Startup & Business Alignments
- Research Ventures
- International Case Studies
- Industrial Visits
- Foreign Language
- Add on Skill Certifications
- Sports - Cultural Configurations
- Cross Domain Industry Specialisation
- Mentoring and Seed Funds for Startups
- International Alumni Interactions
- Association as Mentor with MCED
- Association as Mentor with IIT's
- Association as Mentor with Startup India

**AICTE Approved 3/4 Years' Full time Undergraduate Course**

**BBA** — Bachelor of Business Administration

**BCA** — Bachelor of Computer Applications

**Call for more details:**

**MBA/BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**MCA/BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more